# फिलाडेल्फिया अधिवेशनाचे खास दालन 'लोकमत'वर

**पुणे, दि. १ :** बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने अमेरिकेत फिलाडेल्फिया येथे उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाची माहिती देण्यासाठी लोकमत ऑनलाईनने (lokmat.com) एक स्वतंत्र दालन सुरू केले आहे. या अधिवेशनाचे कार्यक्रम, त्यामागची भूमिका, विविध कलाकारांची माहिती, मुलाखती, ताज्या घडामोडी आणि छायाचित्रे यांचा या दालनात समावेश आहे. प्रख्यात अभिनेत्री आणि **(पान २ वर)**

०२-०६-०९

**लोकमत** [redacted]

# फिलाडेल्फिया अधिवेशनाचे खास दालन 'लोकमत'वर

**(पान १ वरून)** नृत्यकलानिपुण अर्चना जोगळेकर यांची मुलाखत हे या दालनाचे वैशिष्ट्य ठरावे. अधिवेशनाच्या वृत्तांकनापासून विविध मुलाखतींसाठी श्रीमती यशोमती गोडबोले यांनी विशेष सहकार्य प्रदान केले आहे. त्या अमेरिकेतच स्थायिक असून, या अधिवेशनाची ठळक वैशिष्ट्ये त्या शब्दबद्ध करणार आहेत.

अमेरिकेतील मराठी वाचक आणि लोकमतच्या देशातील वाचकांसाठी हे विशेष दालन या महिनाअखेरपर्यंत लोकमतच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.